हिंगोली जिल्ह्याच्या कृषी विकासात नाबार्डची भूमिका - एक अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या

वाणिज्य शाखेअंतर्गत पीएच.डी. संशोधन पुर्व आराखडा

-: संशोधक :-

मापारी सुभाष किशनराव

(एम.कॉम., सेट)

-: मार्गदर्शक :-

डॉ. प्रदिप एस. जाधव

सहा. प्राध्यापक, (वाणिज्य विभाग)

बहिर्जी स्मारक महाविद्यालय, वसमत

हिंगोली जिल्ह्याच्या कृषी विकासात नाबार्डची भूमिका - एक अभ्यास

प्रस्तावना :-

जगातील विकसनशील अर्थव्यवस्था या प्रामुख्याने कृषीप्रधान आहेत. भारतीय अर्थव्यवस्थे मध्ये कृषीचे सुध्दा मुख्य स्थान आहे. भारतीय जीवन हे ग्रामीण परंपरांशी निगडीत आहे. असा बहुतांश समाज हा ग्रामीण भागात वास्तव्यास असून ग्रामीण भारताचा उदरनिर्वाहाचा प्रमुख आधार कृषीच आहे. त्यामुळेच आज ग्रामीण विकासाच्या संशोधनाला नविन आयाम प्राप्त झाले आहेत. यामध्ये स्वाभाविकच ग्रामीण जनतेच्या विकासाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. जागतीक मानव विकास अहवालाने निर्देशीत केल्या नुसार भारतातील ग्रामीण जनतेसाठी उपलब्धअसलेल्या पायाभूत सेवा, सुविधांची व्याप्ती मर्यादित आहे. त्या सुविधा आहे त्यांची देखभाल व दुरुस्ती याबाबत ग्रामीण भागात कमालीची उदासीनता दिसून येते.

खेड्याकडे चला या गांधीजीच्या संदेशाच्या अगदी विरुध्द झाले आहे. ग्रामीण भागातून शहरी भागात होणाऱ्या लोकसंख्येच्या स्थलांतरामुळे नागरी विकासाच्या न संपणाऱ्या समस्या निर्माण होत आहेत. वेगाने होणारे नागरीकरण ग्रामीण व शहरी भागात मोठ्या प्रमाणावर विषमता निर्माण होण्यास कारणीभूत ठरत आहे. आर्थिक विकासाचे फायदे सामान्य मानसापर्यंत पोहोचल्या शिवाय हि विषमता कमी होण्याची शक्यता नाही. त्यासाठी आर्थिक व प्रशासकीय रचनेत बदल अत्यावशक आहेत. ग्रामीण भागाच्या विकासासाठी विविध योजनांची आखणी व त्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासाठी विशेष प्रयत्न करणे अती आवश्यक आहे. पं.जवाहर लाल नेहरु यांनी सुरुवातीच्या काळात म्हटले होते की इतर सर्व बाबी बदलु शकतात पण कृषी विकासाचे प्रश्न सोडविण्याचे प्राधान्य बदलता येणार नाही. स्वातंत्र्योत्तर काळात औद्योगीक क्षेत्रात जे यशोशिखर गाठण्यात आले त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे कृषी क्षेत्रास दिलेले प्राधाण्य होय. सन १९५१ च्या जनगणने नुसार भारताच्या एकूण लोकसंख्यैपैकी ७० टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात राहत असे. सन २००१ च्या लोकसंख्या तर २०११ च्या जनगणनेनुसार अजूनही ६२ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागातच राहात आहे. साहजीकच ग्रामीण भागात राहणाऱ्या जनतेचा विकास म्हणजेच ग्रामीण भारताचा विकास होय. मात्र ग्रामीण भारताचा विकास करताना निरक्षरता, बेकारी, अज्ञान, दारिद्रय, भांडवल कमतरता

इत्यादी प्रमुख्य समस्या आहेत. ग्रामिण भारतातील या समस्या सोडविल्या शिवाय ग्रामिण अर्थ व्यवस्था मजबुत होणार नाही त्यासाठी ग्रामिण विकासाकरिता ग्रामीण भागात पायाभूत क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर दिर्घ कालीन गुंतवणूक करावी लागणार आहे. त्यासाठी फार मोठ्या प्रमाणात भांडवलाची उपलब्धता अत्यावशयक आहे. भांडवल उभारण्याची हि जबाबदारी बँका अधिक चांगल्या प्रकारे पार पाडू शकतात.

भारत देश कृषिप्रधान असल्याचे सत्य मागील अनेक शतकापासून सांगीतले जात असले तरी गेल्या काही वर्षापासून देशांर्गत उत्पादनातील कृषीचा हिस्सा मात्र घसरत चालला आहे. सन १९५० ते ५१ मध्ये देशांतर्गत एकूण उत्पादनात कृषीचा वाटा ५५ टक्के होता तो सन १९९६ ते ९७ मध्ये ३१.५० टक्के आणि सन २००३ ते ०४ मध्ये तो आणखी घसरुन २४.४ टक्के इतका राहीला तर सन २००९ ते १० मध्ये जवळपास १० टक्के पर्यंत कमी झाला. भारत अन्न धान्याच्या बाबतीत स्वयपूर्ण झाला असला तरी कृषीचा स्थूल देशांतर्गत उत्पादनातील हिस्सा मात्र कमी झाला आहे. परंतु त्याच वेळी कृषी क्षेत्रावर अवलंबून असाणाऱ्यांच्या संख्येत मात्र फारसा बदल झालेला दिसत नाही. सन १९८१ मध्ये देशातील एकूण रोजगारास शेतकरी व शेतमजूर यांचे प्रमाण ६६.६ टक्के होते हे प्रमाण सन १९९१ मध्ये ६४.८ टक्के इतका राहिला असून वर्तमान स्थितीतही त्यात फारसा बदल दिसून येत नाही. त्यामुळे देशाच्या आर्थिक विकासासाठी लोकांचे कल्याण होण्यासाठी कृषी क्षेत्राचे दायीत्व मोठे आहे. कोणत्याही देश असो तो कृषी उत्पनाच्या निर्यातीवरच संपन्न होतो म्हणून कृषी बरोबरच कृषी आधारीत प्रक्रिया उध्योगांचाही विकास आवश्यक आहे. विदेशामध्ये कृषी मालावर २० टक्के प्रक्रिया केली जाते. भारता हे प्रमाण केवल २ टक्के आहे. तसेच आपल्या देशाची कृषी केवळ ०.५ टक्के इतकीच आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेतील कृषी क्षेत्राचे महत्त्व :-

भारताच्या आर्थिक व सामाजिक जीवनात कृषीचे मानवी संस्कृतीच्या उत्पत्तीपासून अनन्य साधारण महत्त्व राहिले आहे. ब्रिटीशांच्या आगमनापूर्वी भारतीय शेती सर्व प्रकारच्या उत्पादनात अग्रेसर होती. ब्रिटिशांच्या आगमनानंतर मात्र ब्रिटिशांनी भारतीय कृषीक्षेत्र व कृषीशी संलग्न क्षेत्रामध्ये शोषणकारी प्रतीकूल धोरणे राबविली त्यामुळे भारतीय कृषी क्षेत्राची पिछेहाट झाली. कृषी हा भारतीय अर्थव्यवस्थेला प्रमुख आधार असल्याने अर्थकारणाचा कणा आहे.

अठराव्या शतकापासून भारताच्या अर्थव्यवस्थेत कृषीला महत्त्व आहे. व आज एकविसाव्या शतकात देखील भारतीय अर्थव्यवस्थेत कृषीचे महत्त्व कायम आहे.

राष्ट्रीय उत्पन्न हा देशाच्या आर्थिक विकासाचा निर्देशांक असतो. पहिल्या महायुध्दांच्या काळात राष्ट्रीय उत्पन्नामध्ये कृषीचा वाटा २/३ होता. स्वातंत्र्यानंतर देशामध्ये पंच वार्षीक योजनांचा अवलंब करण्यात आला. या नंतर कृषीचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा क्रमशः कमी कमी होउ लागला हे वरील तक्यात दर्शविले आहे.नियोजन काळात अर्थव्यवस्थेचा सर्वांगीण विकास झाला. अर्थव्यवस्थेची इतर क्षेत्रे प्रगत झाली. त्या तुलनेत कृषीचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा कमी झाला. ज्या देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नात कृषी क्षेत्राचा वाटा कमीत कमी झाला. त्या देशाला विकसित देश असे म्हणतात. उदा. अमेरिका ३ टक्के, इंग्लंड २ टक्के, कॅनडा ४ टक्के, ऑस्ट्रेलिया ५ टक्के असे दिसून येते.

कृषी क्षेत्र व रोजगार :-

भारतातील एकूण लोकसंख्येचा मोठा भाग आपल्या उपजिविकेसाठी कृषीवर अवलंबून आहे. सन १९५१ च्या जनगणनेनुसार एकूण काम करणाऱ्या लोकसंख्येपैकी ७० टक्के लोक कृषी क्षेत्रावर अवलंबून होते. सन १९७१ च्या ३६.१० कोटी लोकसंख्यापैकी ग्रामीण २९.९० कोटी शेतकरी १९.३९ टक्के तर शेतमजूर ५० टक्के असे प्रमाण होते. प्रगत देशात कृषीवर अवलंबून असणाऱ्या लोकांचे प्रमाण कमी असते. कारण ज्या देशातील लोकांच्या उपजिविकेचे प्रमुख साधन कृषी असेल ते देश विकसनशिल समजले जातात. कृषीक्षेत्रावर अवलंबून असणाऱ्या लोकांचे प्रमाण ज्या देशामध्ये जास्त त्या देशामध्ये पूर्ण विकास झालेला दिसून येत नाही. आपल्या देशात सन २००१ मध्ये एकूण लोकसंख्येपैकी कार्यशिल लोकसंख्येच्या ५९ टक्के लोकसंख्या कृषीक्षेत्रावर अवलंबून होती. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून कृषि क्षेत्राची भुमिका फार महत्त्वाची आहे.

भारतीय पातळीवर बँकांची उत्पत्ती :-

भारतातही बँकिंग व्यवसाय फार पूर्वीपासून अस्तित्वात आहे. मनुस्मृती, कौटील्या अर्थशास्त्र या सारख्या ग्रंथामध्ये कर्जव्यहार व्याज इत्यादी संबंधी विवेचन आढळते. भारतात

आधुनिक बँकांची सुरुवात इष्ट इंडिया कंपनीच्या अधिकाऱ्यांनी सुरु केली भारतातील पहीली आधुनिक बँक म्हणून सन १७७० मध्ये मध्ये स्थापन झालेली हिंदुस्थान बँक ही होय.

सन १८५० ते १८८५ दरम्यान जर्मनीमध्ये हार्यन शुल्झ आणि इटलीमध्ये ल्युईगी लुक्झारी यांनी काही नागरी सहकारी पतसंस्था सुरु केल्या त्याच धर्तीवर भारतात विठ्ठल लक्ष्मण कवठेकर यानी बडोदा येथे फेबु १८८९ साली अनोन्य सहाय्यकारी मंडळ लिमीटेड या नावाची संस्था स्थापन केली. आजही ती संस्था चांगल्या प्रकारे कार्यरत आहे. एका अर्थाने भारतातील कर्ज देवघेवीची मुहूर्तमेढ या संस्थेच्या रुपाने रोवली गेली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

सन १९०४ चा भारतात पहिला सहकार कायदा मंजूर झाल्या नंतर मद्रास राज्यात कांजीवरम येथे आक्टोंबर १९०४ मध्ये पहीली नागरी सहकारी पतसंस्था स्थापन झाली. आक्टोंबर १९०५ मध्ये धारवाड जिल्ह्यातील वेटेगीरी येथे व डिसेंबर १९०५ मध्ये बंगलोर येथे नागरी सहकारी पतसंस्था स्थापन करयात आल्या. सन १९१५ पर्यंत नागरी सहकारी संस्थेकडे फारसे लक्ष दिले गेले नाही. परंतु स्थानिक व्यापारी बँकांचे पतपुरवठ्याच्या कार्यातील अपयश, मध्यमवर्गीय व लहान उद्योग यांच्याकडे झालेले दुर्लक्ष या पार्श्वभूमीवर सन १९१५ मध्ये मॅक्लेगन समितीने नागरी सहकारी संस्थाचे महत्त्व प्रतिपादीत केले त्यामुळे नागरी भागातील मध्यमवर्गीय सुशिक्षीत मंडळीचे लक्ष या संस्थाकडे जाण्यास सुरुवात झाली.

सावकारी पाशातून मुक्त होऊन स्वतःच्या आर्थिक गरजा भागविण्याच्या दृष्टीने या नागरी पतसंस्था उपयुक्त आहेत. या जाणीवेतून १९१३-१९३८ या काळात मुंबई व मद्रास प्रांतात अनेक नागरी सहकारी पतसंस्था स्थापन झाल्या.

बँकेचा अर्थ :-

१. डॉ.एच.एल.हर्ट :-

जी व्यक्ति किंवा संस्था आपल्या दैनंदिन व्यवहारात ज्यांच्या कडून आणि ज्यांच्या करिता चालू ठेव खात्यावर पैसे स्विकारते आणि त्यांनी काढलेल्या आदेशानुसार पैसे देते त्या व्यक्ती किंवा संस्थेस बँक असे म्हणतात.

२. प्रा.आर.आर.शेअर्स :-

ज्या व्यक्तिच्या किंवा संस्थेच्या कर्जाचा उपयोग आपण आपले देण्या घेण्याचे व्यवहार करण्यासाठी मान्य करतो ती व्यक्ति किंवा संस्था म्हणजे बँक होय.

बँकाचे महत्त्व :-

देशाच्या आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत बँकांची भूमिका महत्त्वाची असते आर्थिक विकासासाठी पैसा निर्माण करुन समाजात तो जास्तीत जास्त गतीने वापरला जाने महत्त्वाचे असते. बँकांचा खेळत्या पैशाशीच जवळचा संबंध आहे. सर्वसाधारण जनता, शेतकरी, व्यापारी तसेच उत्पादक यांच्या दरम्यान महत्त्वाचा दुवा म्हणून बँका महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडत आहेत. सर्व सामान्य लोकांसमोर असलेला महत्त्वाचा प्रश्न म्हणजे कमावलेला पैसा सुरक्षीत कसा राहील? या समस्येची सोडवणूक बँका लोकांना पैसा सुरक्षीत ठेवण्याची सुव्यवस्था उपलब्ध करुन देतात. जनतेकडे शिल्लक असलेला पैसा बँकाकडे येत असल्यामुळे बँका हा पैसा ज्या व्यक्तिंना गरज आहे. अशा व्यक्तिंना कर्जाऊ देतात. अशा प्रकारे बँका एकाच वेळी कर्जदार व सावकार अशी दूहेरी भूमिका पार पाडतात.

बँका समाजातील विविध घटका कडील पैसा बचत रुपाने एकत्रीत करुन गुंतवणुकीसाठी हा पैसा शेतकरी व कारख्यानदारांना कर्ज आणि अधिविकर्ष वैगैरेच्या स्वरुपात पुरवठा करतात. यामुळे शेतीच्या विकासास व औद्योगीकीकरणास चालना मिळते. देशात व्यापक स्वरुपात बँका मार्फत पैशाचे व्यवहार होत असल्यामुळे निरनिराळ्या भौगोलिक क्षेत्रांची आर्थिक प्रगती व समतोल राखण्याचा प्रयत्न केला जातो. बँका अभावि हे शक्य झाले नसते. आजच्या आधुनिक युगात बँका जनतेच्या सोई सवलती व सुरक्षिततेसाठी धनादेश, डिमांड ड्राप्ट, पतपत्रे इत्यादी द्वारे पैशाच्या देवाण घेवाणीचे व्यवहार सुलभतेने घडवूण आणत आहेत. यावरुन असा निष्कर्ष काढता येईल की ज्या देशात बँकीगं व्यवसाय उत्कृष्ट आहे. त्या देशाची अर्थव्यवस्था भक्कम पायावर उभी राहण्याच्या दृष्ट्रीने आवश्यक असणारी परिस्थतीती निर्माण होण्यासाठी मार्गातील एक मोठी अडचण दूर झालेली आहे. अशा देशाला आर्थिक स्थैर्यासह आपली विकासाची उद्दिष्टे पूर्ण करणे अवघड नाही.

अर्थव्यवस्थेतील बचत व गुंतवणूक करण्याऱ्या व्यक्ती व संस्था भिन्न-भिन्न असतात. या सर्व घटकांना एकत्रीत करणाऱ्या संस्था वेगवेगळ्या असतात. बँका या सर्व घटकांना एकत्रीत आणून उत्पादन प्रक्रियेत सातत्य ठेवण्याचे कार्य करतात. बँका मध्यस्थाचे कार्य करुन

अर्थव्यवस्थेच्या जलद विकासाला हातभार लावतात. उत्पादन, विभाजन, उपभोग व विनिमय या सर्वच क्षेत्रात बँकाची भूमिका महत्त्वपूर्ण असते. बचतीस प्रोत्साहन देणे, गुंतवणूक वाढविणे, व्यावसायीक कौषल्य निर्माण करुन व्यवसाय संघटन वाढविणे या सारखी महत्त्वाची कार्ये बँका करीत असल्यामुळे बँका आधुनिक अर्थव्यवस्थेचा आधारस्तंभ ठरतात.

कृषी व ग्रामीण विकासासाठी वित्त पुरवठा :-

भारतातील कृषीक्षेत्र असंघटीत व्यवसाय आहे. कृषीक्षेत्रामध्ये अनेक अनिश्चितता आहेत. यामध्ये लहरी व अवेळी पडणारा पाऊस, भांडवल कमतरता यासारखे विविध कारणे आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात कृषी विकासासाठी विविध योजनांचा अवलंब केल्यामुळे कृषी उत्पादन पातळी वाढली. परंतु भारतीय कृषी व शेतकऱ्यांच्या परिस्थितीमध्ये मुलभूत स्वरुपाचे परिवर्तन होऊ शकले नाही. त्यासाठी अजूनही मोठ्या प्रमाणात पतपुरवठ्याची आवश्यकता आहे. कृषी क्षेत्राचा लहाण आकार, पावसाच्या पाण्यावर अवलंबन, मान्सूनचा लहरीपणा त्यामुळे पडणारे दुष्काळ या सारख्या कारणामुळे इतर व्यवसायापेक्षा कृषीला पतविषयक गरजेची तिव्रता अनेक पटींनी जास्त आहे. कृषीमाल उत्पादनासाठी लागणारा दीर्घकाळ व उपदनातील अनियमितपणा यामुळे शेतकऱ्यांची पतपुरवठा विषयक गरज स्थायी स्वरुपाची बनलेली आहे. ही गरज पूर्ण करण्यासाठी निरनिराळ्या संस्था मार्फत वितपुरवठा करणाऱ्या संस्थाकडून मदत घेतात यामध्ये सावकार, पेठीवाले, नातेवाईक व्यापारी या सारख्या बिगर संस्थात्मक तसेच, प्राथमिक सहकारी कृषी पतपुरवठा संस्था (Paccs) सहकारी बँका, व्यापारी बँका, क्षेत्रीय ग्रामीण बँका RRBS नाबार्ड NABARD इत्यादी शेतकरी आपल्या कृषी व कृषी संबंधीत शेतकरी कार्याच्या पूर्ततेसाठी या विविध स्त्रोता मार्फत कर्ज स्वरुपात मदत घेतात. यामध्ये अल्पकालीन व मध्यमकालीन व दीर्घकालीन असे वित्तपुरवठाचे प्रकार पडतात कृषीक्षेत्रासाठी दीर्घकालीन पतपुरवठ्याची गरज अधिक प्रमाणात असते. कारण कृषी उत्पादन निर्मितीचा कालखंड दीर्घकालीन असतो. परिणामी कर्ज परतफेडीसाठी जास्त कालखंड मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे दीर्घकालीन पतपुरवठा करण्यासाठी भूविकास बँकांची सुरुवात सन १८६३ मध्ये **भारतीय भू तारण बँक** मर्यादित या नावाने लंडन मध्ये एका ब्रिटीश कंपनीने सुरू केली होती. परंतु प्रत्यक्ष भारतात १९२० मध्ये **पंजाब थॉंग** येथे स्थापन झाली. या बँकेचे नंतर भू विकास बँक असे नामांकरण करण्यात आले. यानंतर या बँकाची सन १९२९ च्या महामंदीने

व्यवस्था कोलमंडली. नंतरच्या काळात भूविकास बँका स्थापन करण्यात आल्या या बँकांचे नामांकरण राज्य सहाकरी कृषी व ग्रामीण विकास बँका असे करण्यात आले.

राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक नाबार्ड :-

(National Bank For Ariculture and Rural Development)

भारताच्या बँक व्यवसाय संरचनेची शिखर संस्था म्हणून भारतीय रिझर्व बँक कार्य करते. रिझर्व बँकेच्या कार्याच्या स्वरुपाकडे लक्ष दिल्यास असे दिसून येते की, स्वातंत्र्योत्तर काळात विकसित होणाऱ्या भारतीय अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्राकडे पुरेसे लक्ष देणे रिझर्व बँकेला अशक्य झाले. त्यामुळे भारतीय रिझर्व बँकेने कार्यभार हलका करण्यासाठी व ग्रामीण समस्या सोडविण्यासाठी विशेष लक्ष पुरविण्याकरीता अखील भारतीय ग्रामिण पत आढावा समिती ने सुचविल्या प्रमाणे शेतकरी पतमंडळाची (ABC)स्थापना केली. ग्रामीण पतविषयक धोरणाची आखणी व त्यात सुधारणांची जबाबदारी या मंडळाने पर पाडावयाची होती. परंतु मंडळाला वैधानिक अधिकार नसल्यामुळे केवळ एक सल्लागार मंडळ असेच त्याचे स्वरुप राहिले. सल्लागार स्थानामुळे हे मंडळ आपली कार्ये आपेक्षे नुसार पार पाडू शकले नाही.

भारतीय रिझर्व बँके द्ववारा श्री बि.शिवरामन् यांच्या अध्यक्षतेखाली कृषी क्षेत्रातील कर्जपुरवठ्याच्या संदर्भात आढावा घेण्यासाठी दिनांक २८ नोव्हेंबर १९७९ मध्ये स्थापन केलेल्या कृषी व ग्रामीण विकासासाठी असणाऱ्या पत व्यवस्थेचा आढावा घेणारी समिती ने (Committee to Review Arrangement For institutional creditfor Agriculture and Rural Development-CRAFICAFD) आपला अहवाल शिफारशी सह सन १९८१ मध्ये सादर केला. या सिमितीने ग्रामीण भागाच्या पतविषयक गरजा आणि विकास करण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर एक **शिखर बँक** निर्माण करण्याची शिफारस केली. राष्ट्रीय कृषी आयोगानेही असेच मत व्यक्त केले. त्यानुसार १२ जुलै १९८२ रोजी राष्ट्रीय कृषि आणि ग्रामीण विकास बँक- नाबार्ड चा उदय झ ाला. रिझर्व बँकेचे पूर्नवित आणि विकास महामंडळाची सर्व कार्य आता नाबार्ड करीत आहे. तसेच सन १९७५ मध्ये निर्माण करण्यात आलेल्या प्रादेशिक ग्रामीण बँकांची जबाबदारीही नाबार्ड कडेच सोपविण्यात आली. ग्रामीण भागाचा समन्वित विकास करुन तेथे समृध्दी आणण्याच्या दृष्टीने कृषी लघुउद्योग, ग्रामोद्योग, हस्तोद्योग व इतर आर्थिक उपक्रमांना मदतीचा हात देण्याच्या हेतूने सध्या नाबार्ड कार्य करीत आहे.

नाबार्ड चे उद्देश :-

नाबार्ड निर्मितीच्या अधिनियमात असे नमूद आहे. की, सर्वांगीण विकास व उन्नती करण्यासाठी कृषी लघुउद्योग हस्तोद्योग व अन्य ग्रामीण कारागीर व ग्रामीण क्षेत्राच्या विकासासाठी कार्य करणाऱ्या इतर संस्थाचा विकास व संवर्धनासाठी आर्थिक मदतीसह इतर सर्वप्रकारच्या मदतीसाठी नाबार्ड सदैव तत्परतेने कार्य करील.

नाबार्ड स्थापनेच्यावेळी संसदेत मांडलेल्या विधेयकातील उद्देशांचे वर्णण पुढील प्रमाणे.

१. नाबार्ड ग्रामीण भागातील कृषी लघुउद्योग, कुटीरोद्योग व ग्रामीण भागातील इतर उद्योगाचे संवर्धन व विकासासाठी वित्तपुरवठ्याची निती आराखडा व अंमलबजावणी या संदर्भातील सर्व बाबींचे व्यवस्थापन करील.
२. नाबार्ड ग्रामीण भागातील विविध विकासात्मक कार्यासाठी दिल्या जाणाऱ्या संस्थात्मक कर्ज यामध्ये दीर्घकालीन व अंशकालीन कर्ज, इत्यादीसाठी पूनर्वित संस्थेच्या रुपात काम करील.
३. केंद्र सरकारच्या मार्गदर्शनानुसार ग्रामीण भागाच्या विकासासाठी कार्य करणाऱ्या वित्तसंस्थांना प्रत्यक्ष कर्जपुरवठा करील.
४. नाबार्ड चा भारतीय रिझर्व बँकेशी जवळीकतेचा संबंध राहील व तीच्या सोबत राहून राहून ग्रामीण भाग व कृषी क्षेत्राच्या विकासासाठी कार्य करील.

नाबार्डची कार्ये :-

कृषी व ग्रामीण विकास संदर्भात नाबार्डची कार्ये पुढील प्रमाणे आहेत.

१. नाबार्ड ग्रामीण क्षेत्र व कृषी क्षेत्राच्या विकासासाठी आर्थिक मदत करणारी एक शिखर संस्था आहे. या दृष्टीने कर्जपुरवठ्याची निती आराखडा व अंमलबजावणी करण्यासाठी अधिकृतरीत्या निर्माण करण्यात आलेली संस्था आहे.
२. देशातील सर्व जिल्ह्यांसाठी ग्रामीण कर्ज योजना बनविने.
३. ग्रामीण बँकींग, कृषी व ग्रामीण विकास इत्यादी क्षेत्रांच्या विकासासाठीच्या संशोधनात्मक कार्यांनां प्रेरणा देणे.
४. समन्वित ग्रामीण विकास साधता यावा या करीता कृषीक्षेत्र, लघुउद्योग, ग्रामीण व कुटीरद्योग तसेच ग्रामीण कारागीरांचा उत्कर्ष साधता यावा या करीता कार्यक्रम राबविण्यासाठी गुंतवणूक व उत्पादन कार्या करीता पूनर्वित पुरवठ्याची व्यवस्था करणे मात्र नाबार्ड शेतकरी व अन्य ग्रामीण व्यक्तींना प्रत्यक्षरीत्या कर्जपुरवठा करीत नाही.

५. राज्य सहारी बँका क्षेत्रीय ग्रमीण बँका व भूविकास बँकांना अल्प मुद्दतीचा, मध्यम मुदतीचा व दीर्घ मुदतीचा पतपुरवठा करणे.

६. सहकारी संस्थांना भागभांडवल उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकारांना २० वर्षे मुदत्तीपर्यंतची कर्जे मुजूर करणे.

७. कृषीक्षेत्र व ग्रामीण परिसराच्या विकासा करीता कार्य करणाऱ्या तसेच केंद्र सरकारची मान्यता असलेल्या संस्थांना प्रकल्प पूर्ण करण्यासाठी दीर्घ मुद्दतीचा कर्जपुरवठा करणे किंवा या प्रकारच्या संस्थांचे भाग किंवा रोखे खरेदी करुन त्यांना साधन सामुग्री मिळवूण देणे.

८. नाबार्ड ज्या योजनासाठी वित्तपुरवठा करणे त्या योजनावर नियंत्रण व मुल्यांकन.

९. लघुउद्योग, ग्रामीण उद्योग, कुटीर उद्योग विकेंद्रीत क्षेत्रातील उद्योगांच्या विकासा करीता कार्य करणाऱ्या केंद्र सरकार, राज्य सरकारे, नियोजन मंडळ तसेच राष्ट्रीय पातळी व राज्यपातळी वरील कार्य करणाऱ्या संस्थाच्या कार्यामध्ये एकसुत्रीपणा आणणे.

१०. प्राथमीक सहकारी समित्या वगळून क्षेत्रीय ग्रामीण बँका व सहकारी बँकांच्या कार्याची देखरेख करणे.

११. कृषी व ग्रामीण विकास यांच्याशी संबंधित संशोधनाला प्रोत्साहन देणे व साहाय्य करणे या करीता संशोधन व विकास निधी निर्माण करण्यात आला आहे.

नाबार्डची कामगीरी :-

नाबार्डची उद्दीष्टे कार्यक्षेत्र व कार्याद्दल अभ्यास करतांना नाबार्ड कृषी लघुउद्योग, कुटीरउद्योग, ग्रामोउद्योग, ग्रामीण कारागीर यांच्या विकासा करीता विविध कार्य करणाऱ्या संस्थांना मदत करणारी शिखर संस्था आहे. नाबार्ड ह्या संस्थांना त्यांची धोरणे ठरविण्यासाठी योजनांची आखणी व अंमलबजावणी करण्यासाठी कर्ज पुरवठा करते. नाबार्ड च्या कार्याची व्याप्ती मोठी आहे.

१. कृषी क्षेत्रातील हंगामी कार्यासाठी सवलतीच्या दराने पतपुरवठा करणे.

२. लहान व मागास शेतकऱ्यांना पतपुरवठा.

३. कृषीला मध्यमकालीन पतपुरवठा.

४. सहाकरी संस्थांचे भाग-भांगडवल खरेदी करण्यासाठी राज्य सरकारांना कर्ज पुरवठा.

५. राज्य सहकारी बँका व क्षेत्रीय ग्रामीण बँकांना पुर्नविताचा पुरवठा.

६. समन्वित ग्रामीण विकास साधण्यासाठी संस्थांना पुर्नवित्ताचा पुरवठा.

७. सहकारी समित्यांची पुनर्रचना.

८. ग्रामीण भागाच्या विकासासाठी आरधारभू संरचना विकास निधिची निर्मिती.

९. पंचायती राज संस्था व निमसरकारी संस्थांना सवलतीच्या दराने कर्जपुरवठा.

१०. ग्रामीण आधार संरचना विकास निधिच्या कार्यक्षेत्राचा विस्तार.

कृषी व ग्रामीण सर्वांगीण विकासासाठी तसेच ग्रामीण जिवनाशी निगडीत असलेल्या बँकांना मदत करण्यासाठी नाबार्डने प्रशंसनिय कामगीरी केली आहे. नाबार्डने राबविलेल्या विविध योजना व त्यातील तरतुदी या संदर्भात सविस्तर अध्ययन प्रकरण चार मध्ये केले आहे.

संशोधन साहित्याचा आढावा :-

बासू एस. के.

एस. के. बासू यांनी त्यांच्या अभ्यासात भारतातील औद्योगिक क्षेत्रासाठी आवश्यक असलेल्या वित्तीय गरजेचा अभ्यास केला आहे. त्यांनी आपल्या अभ्यासात भारतासह जपानसारख्या देशातील मुलभूत क्षेत्रासाठी वित्तपुरवठा करणाऱ्या वित्तीय संस्थाचे परिक्षण केले आहे. त्यांच्या मते, औद्योगिक वित्तपुरवठयाची व्यवस्था ही देशातील औद्योगिक प्रगतीसाठी महत्वपूर्ण घटक असते कारण त्याशिवाय औद्योगीकरण करणे कठीण होते असे अभ्यासले आहे.

घोषाल एस. एन.

घोषाल यांच्या मते, अभ्यासामध्ये देशातील सिमीत शेतकरी व अल्प भूधारकांच्या विकासासाठी अल्पमुद्दती आणि मध्यम मुद्दती कर्जपूरवठा करणे किती आवश्यक आहे याचा अभ्यास केला आहे. त्यांच्या मते, सहकारी संस्थाचे जाळे विस्तृत असून सुध्दा त्यांची भूमिका शेतकऱ्यांना वेळेवर व पुरेसा वित्तपुरवठा करण्यामध्ये कमी पडत आहे. कारण या सहकारी संस्थांमध्ये अनेक उणिवा व अडचणी निर्माण झाल्यामुळे कृषीक्षेत्र व पर्यायाने शेतकऱ्यांच्या मागासलेपणासाठी

कांही प्रमाणात का होईना सहकारी वित्तसंस्था कारणीभूत आहेत असे म्हणतात. हा मागासलेपणा भरून काढने आवश्यक आहे असे सांगितले आहे.

शर्मा बी. पी.

बी. पी. शर्मा यांनी कृषी क्षेत्रासाठी वित्तपुरवठा करणाऱ्या वित्तपसंस्थाचा अभ्यास केला आहे. अभ्यासात त्यांना असे दिसून आले कि, विविध वित्तसंस्थामध्ये विशेषत्वाने व्यापारी बँका कृषी क्षेत्राच्या विकासामध्ये महत्वपूर्ण भूमिका बजावत आहेत. कृषी क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांना बचत करण्यासाठी प्रेरित करण्यामध्ये व्यापारी बँकांची भूमिका महत्वपूर्ण ठरत आहे. परंतू या क्षेत्रात आणखी मोठय प्रमाणात व्यापारी बँकांनी योगदान देणे आवश्यक आहे. अल्प भूधारक सिंमात शेतकरी ईत्यादी घटकांना आवश्यक त्या प्रमाणात वित्तपुरवठा करु शकलेल्या नाहीत असा निष्कर्ष मांडला.

चौबे बी. एन.

यांनी कृषी क्षेत्रास कर्ज पुरवठा करणाऱ्या वित्तसंस्थाच्या भूमिकेचा अभ्यास केला आहे. त्यांना असे दिसून आले कि, वित्तसंस्थांकडून पूरेसा वित्तपुरवठा कृषी क्षेत्रास होत नाही. यावर उपाययोजाना म्हणून ते अशी शिफारस करतात कि या विविध वित्तसंस्थांनी आपल्या एकूण कर्जवाटपाच्या राशीपैकी कृषी क्षेत्रासाठी विशिष्ट राशी राखीव स्वरुपात निर्धारीत करुन ती कृषी क्षेत्रासाठी वित्तरीत करण्यात येईल. यासाठी धोरणाची निश्चिती करावी अशी शिफारस त्यांनी केली.

जोधा एन. एस.

यांनी ग्रामीण आणि कृषी भागाच्या विकासात त्या क्षेत्रात उपलब्ध असणाऱ्या नैसर्गिक साधन संपत्तीचे योगदान अभ्यासले आहे. त्यांना असे दिसून आले की, नैसर्गीक साधन संपत्तीचा त्या भागाच्या विकासात महत्वपूर्ण वाटा असतो. यामध्ये ग्रामीण भागातील पाळीव पशुंसाठी चाऱ्याची कुरणे, सर्वसाधारण जंगले, खनिज संपत्ती, पडीक जमिन, तलाव, नदी, नाले, नदयांच्या किणाऱ्याच्या जमिनीचे प्रमाण ई. चा समावेश होतो असे म्हटले.

देशपांडे आर. आणि रेड्डी आर.

यांनी ग्रामीण भागातील लोकांसाठी उपलब्ध असणाऱ्या पाणी पुरवठयाच्या सुविधांचा अभ्यास केला आहे. नैसर्गिक नियमानुसार कृषीसाठी उपलब्ध असणाऱ्या पाण्यावर तेथील सर्वच घटकांची मालकी समान स्वरुपात असते. व्यापारी दृष्टीकोण ठेवून कृषी क्षेत्रास उपलब्ध असणाऱ्या पाण्याचा वापर केल्यास त्याचा सर्वांनाच गरिबी निर्मुलनासाठी लाभ होतो. भूमिहीनांना सिंचनाच्या सोयीमुळे अधिकाधिक रोजगार मिळण्यास साहय होते. त्यांनी अशी शिफारस केली आहे. कि, या नैसर्गिक संपत्तीचा चांगला वापर व्हावा यासाठी शासनाने त्या भागातील लोकांच्या सहकार्याने रचनात्मक प्रयत्न करावेत असा निष्कर्ष मांडला.

अग्रवाल बी.

यांनी सन १९७१ ते १९९१ या काळात ग्रामीण भारतातील विविध क्षेत्रात असलेले स्त्रि-पुरुष प्रमाण, दारिद्रय आणि पर्यावरण यांच्या संबंधाचा अभ्यास केला आहे. त्यांच्या अभ्यासात विविध क्षेत्रात असणाऱ्या घटकांच्या प्रमाणावर लक्ष्य केंद्रित केले आहे.

कृषी व ग्रामीण विकासाच्या क्षेत्रात नाबार्ड द्वारे करण्यात आलेले अध्ययन

या भागामध्ये नाबार्डने देशातील ग्रामीण भागातील कृषी क्षेत्र, आर्थिक व सामाजिक क्षेत्राशी संबंधीत अनेक प्रश्नावर केलेल्या कार्याचा आढावा अभ्यासकांनी घेतला आहे. त्यापैकी काही अभ्यासकांचे विचार येथे मांडण्यात आले आहेत.

गुलाटी अशोक आणि बांठीया सिमा

यांनी ग्रामीण भागासाठी वित्तपुरवठा करणाऱ्या वित्तसंस्थाच्या कार्याचा (RFI,S) अभ्यास केला आहे. सन १९८०-१९९७ या काळात सहकारी बँका, व्यापारी बँका आणि क्षेत्रीय ग्रामीण बँका यांच्या ठेवि, कर्ज पुरवठा आणि कर्ज वसूली (अल्पकालीन व दिर्घकालिन कर्ज) ईत्यादी चा अभ्यास केला आहे.

शर्मा के. सी.

यांनी आपल्या लेखात ग्रामीण भागातील पत्त व्यवस्था आणि ग्रामीण वित्त संस्थांचे (RFIS) व्यवस्थापन व कार्यावर प्रकाश टाकला आहे. आपल्या लेखामध्ये

क्षेत्रीय ग्रामीण बँका, सहकारी बँका आणि व्यापारी बँकांच्या ग्रामीण शाखा यांच्या कार्याचा अभ्यास केला आहे.

नायक बिभूदत्ता

यांनी आपल्या अभ्यासात बँकाशी संलग्न अशा बचत गटांनी केलेल्या कार्याचा अभ्यास केला आहे. यामध्ये बचत गटातील सदस्यांच्या गटकार्याचा त्यांच्या कौटूंबिक, सामाजिक-आर्थिक स्थितीत बदल होण्यासाठी बचत गटांचा झालेला लाभ अभ्यासला आहे.

वाडवी बी. बी. बडात्या के. सी. आणि अनाथी एस.

यांनी आंध्रप्रदेश मधिल चित्तौर, निझामाबाद आणि वरंगल जिल्हयातील बचत गटांच्या कार्याचा तसेच बचत गटाच्या सदस्यांचा सर्वांगीण प्रगतीसाठी झालेल्या फायद्यांचा अभ्यास केला आहे. बचत गटांचे सदस्यत्व स्विकारल्यामुळे संबंधीत परिवारातील सदस्यांच्या संयोजन क्षमतेत शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक स्थितीत झालेल्या बदलांचा अभ्यास केला आहे.

सारंगी यु. सी.

यांनी जयपूर मधिल IDS मध्ये केलेल्या मध्यप्रदेश, तामिळनाडू, राजस्थान, महाराष्ट्र आणि उत्तरप्रदेश या पाच राज्यातील वेगवेगळया जिल्हयामध्ये कृषी व ग्रामीण विकासा करिता झालेल्या कर्ज पुरवठयाचा अभ्यास केला. २००३-२००४ व २००६-२००७ मध्ये कृषीसाठी केलेल्या कर्जात दुप्पट वाढ झाली वेगवेगळया राज्यांनी विविध जिल्हया करिता निर्धारित उद्दिष्ट प्राप्त केले. या राज्यात व्यापारी बँकाचे कार्य क्षेत्रीय ग्रामीण बँका पेक्षा चांगले झाले. वेगवेगळया योजना चांगल्या अंमलबजावणीमुळे कृषी क्षेत्राचा विकास होण्यास मदत झाली असा अभ्यास त्यांनी केला.

समिर एस.

अहवालात कृषीमाल प्रक्रिया उद्योग निर्मीती व त्यावर आधारित संरचीत उत्पादन संस्था प्रणालीचा अभ्यास केल्याचे दिसते.

संशोधन पध्दती

संशोधनामध्ये संशोधन पध्दती हा संशोधनाचा मुख्य आधार असतो. प्रस्तूत शोध कार्यात / संशोधनात मुख्यत: प्राथमिक व दुय्यम सामग्रीवर आधारित आवश्यक साहित्य नाबार्ड बँक विषयाची विविध संदर्भ, ग्रंथ, मासिके, लेख, संकेत स्थळ तसेच नाबार्ड कडून प्रसिध्द पुस्तके व हिंगोली जिल्हयातील कळमनूरी तालूका PLP केलेल्या आर्थिक साहय विशेष नोंदी इत्यादी तून उपलब्ध करण्यात आली. नाबार्ड ने कळमनुरी तालुक्यात अनेक योजना राबविल्या आहेत त्यापैकी ग्रामीण गोदाम , कृषी यांत्रीकीकरण कृषी वित्त योजनेची फलश्रूती अभ्यासण्यासाठी संशोधन विषय निवडला आहे.

अध्ययन विषयाची निवड :-

भारतीय अर्थव्यस्थेत कृषीक्षेत्र व ग्रामीण भागाच्या विकासात नाबार्डची भमिर्क्ङ्ग अतिशय महत्त्वाची आहे. हिंगोली जिल्ह्याची अर्थव्यवस्थाही प्रामुख्याने कृषी आधारीत असल्यामुळे प्रस्तुत अभ्यासासाठी हिंगोली जिल्ह्याच्या कृषी विकासात नाबार्डची भूमिका - एक अभ्यास हा विषय निवडला आहे. यामध्ये हिंगोली जिल्ह्याच्या विकासात नाबार्ड ने बजावलेली भूमिका अभ्यासण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :-

नाबार्डची हिंगोली जिल्ह्याच्या कृषी विकासातील भूमिका अभ्यासण्यासाठी पुढील उद्दीष्ट्ये निर्धारीत केली आहेत.

१. नाबार्ड अंतर्गत लाभार्थ्यांचा आर्थिक, सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.

२. हिंगोली जिल्ह्यात नाबार्ड राबवत असलेल्या विविध योजनेचा अभ्यास करणे.

३. हिंगोली जिल्ह्याच्या कृषी विकासात नाबार्डने बजावलेली भूमिका अभ्यासणे.

४. नाबार्डमुळे हिंगोली जिल्ह्यातील कृषी क्षेत्रात झालेल्या बदलांचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहीतके :-

हिंगोली जिल्ह्याच्या कृषी विकासासाठी नाबार्डची भूमिका -एक अभ्यास या अभ्यासासाठी काही गृहीतके विचारात घेतली आहेत ती अशी.

१. नाबार्ड ने हिंगोली जिल्ह्याच्या कृषी विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

२. नाबार्डने हिंगोली जिल्ह्यात विविध योजना राबविल्या आहेत.

३. नाबार्डने हिंगोली जिल्ह्यात राबविलेल्या विविध योजना कृषी विकासासाठी फायदेशीर ठरत आहेत.

संशोधन आराखडा :-

संबंधीत विषयाचे संशोधन हे पूर्णता वर्णनात्मक क्षेत्र आढावा पध्दतीचे असून क्षेत्र आढावा पध्दती द्वारे (प्रशानवली) चौकशी करुन माहिती मिळवून तथ्य जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे. वर्णनात्मक संशोधनाचा मुळ उद्देश हा की, कृषी क्षेत्रात नाबार्ड ने वटवलेली भूमिका याचा तथ्या आधारे विश्लेशन करणे.

तथ्य संकालनाचे स्त्रोत :-

संशोधनासाठी आवश्यक असलेले तथ्य हे प्राथमिक स्त्रोत सोबतच दुय्यम स्त्रोता मार्फत संकलीत करण्यात येणार आहे.

प्राथमिक स्त्रोत :-

संशोधनासाठी आवश्यक महत्वाची माहिती ही संबंधीत उतरदात्याकडून प्रश्नावली द्वारे मिळवण्यात आली आहे. यामध्ये हिंगोली जिल्ह्या मधील विविध गावातील शेतकऱ्यांकडून कृषी यांत्रीकी सोबतच इतर शेतीपुरक योजना संदर्भात नाबार्ड कडून मिळालेली मदत या विषयी सखोल माहिती मिळविण्यात येणार आहे.

द्वितीय स्त्रोत :-

प्रकाशित व अप्रकाशित कागदपत्रे लेख, हस्तलिखीत, अभिलेख, पत्रे इत्यादी पासून जमा केलेली तथ्ये ही द्वित्तीय स्त्रोत होय. द्वितीय स्त्रोताचा विशेष हा की तथ्ये अथवा आकडे स्वतः संशोधीत केलेले नसून ते विविध बँका, नाबार्ड, अग्रणी बँका, भूविकास बँक इत्यादी कडून योजना व योजनांची आकडेवाडी संकलीत करण्यात येणार आहे.

नमुना आकार :-

हिंगोली जिल्ह्यातील कृषी क्षेत्रात शेती विकासा करिता दिलेल्या योगदाना संबंधी नाबार्डच्या भूमिकेच्या अभ्यासासाठी हिंगोली जिल्ह्यातील पाच तालुक्यातील गैर संभाव्य नमुना निवड पध्दतीतील सहेतुक नमुना निवड पध्दतीचा अवलंब करण्यात येणार आहे. पाच तालुक्याला समान प्रतिनिधीत्व देण्याकरिता या नमुना निवड पध्दतीचा अवलंब करुन प्रत्येक तालुक्यातुन ८० याप्रमाणे ८० X ५ = ४०० असा नमुन्याची निवड करण्यात येणार आहे.

संशोधन कालावधी :-

प्रस्तुत संशोधन समस्येसाठी आर्थिक वर्ष २०१४-२०१९ या वर्षाची निवड करण्यात आली आहे.

संशोधनाची मर्यादा :-

नाबार्डची व्याप्ती निश्चितच मोठी आहे. त्यामुळे नाबार्डच्या संपूर्ण अभ्यासाला मर्यादा येतात म्हणून निश्चित निष्कर्षापर्यंत येण्यासाठी आणि परिपूर्ण अभ्यासासाठी हिंगोली जिल्ह्यातील कृषी विकासासाठी नाबार्डची भूमिका -एक अभ्यास एकवढ्यापुरताच सदरील शोध प्रबंध मर्यादीत राहिल.

आकडेवारीचे विश्लेषण आणि सादारीकरण :-

आकडेवारीचे विश्लेषण करण्यासाठी सांखीकीय साधनांचा उपयोग करण्यात येणार आहे. त्यामध्ये सरासरी, साधा वृध्दीदर, सरासरी वृध्दीदर, सिमा विस्तार, प्रमाण विचलन, विचलन गुणांक या साधनांचा समावेश करण्यात येणार आहे.

प्रकरणाची रुपरेषा :-

१. प्रस्तावना :-

हिंगोली जिल्ह्यातीच्या कृषी विकासासाठी नाबार्डची भूमिका -एक अभ्यास -एक अभ्यास अध्ययनासाठी या शोध प्रबंधाचा अभ्यास प्रास्तावित या प्रकरणा सहीत एकूण सहा प्रकरणामध्ये करण्यात येणार आहे.

२. संशोधन पध्दती व संशोधन साहित्याचे पुनरावलोकन :-

दुसऱ्या प्रकरणात नाबार्ड ने कृषी व ग्रामीण भागाच्या विकासासाठी केलेल्या कार्याचा

अभ्यास यापूर्वी विविध अभ्यासाचे निष्कर्ष व संशोधनातिल विविध महत्त्वपूर्ण बाबींचा अभ्यास संशोधन साहित्याचा आढावा या प्रकरणात येणार आहे.

३. हिंगोली जिल्हा : एक दृष्टीक्षेप :-

प्रकरण तीन मध्ये हिंगोली जिल्ह्यातील विविधतेचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. यामध्ये हिंगोली जिल्ह्याचे स्थान, क्षेत्रफळ, भूमी, पर्जन्यमान, हवामान, लोकसंख्या इत्यादी घटकांचा सारांश घेण्यात येणार आहे.

४. कृषी आणि ग्रामीण विकासात नाबार्डचे योगदान :-

प्रकरण चार मध्ये नाबार्ड ची हिंगोली जिल्ह्यातील कृषी व ग्रामीण विकासात भूमिका विषयी विविध योजनांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

५. तथ्य विश्लेषण व अर्थनिर्वचन :-

विषया संबधित प्राथमिक तथ्याद्वारे प्राप्त तथ्याचे सारणीकरण व त्यांचे अर्थ विश्लेषण या प्रस्तुत प्रकरणात करण्यात येणार आहे.

६. निष्कर्ष व शिफारशी :-

प्रस्तुत प्रकरणात करण्यात आले आहे या प्रकरणात तथ्य विश्लेषणा वरून निघालेले निष्कर्ष व शिफारशी सुचविण्यात येणार आहेत.

संदर्भ ग्रंथ सुची

१) Basu S.k. (1961), Industril Finance in India: Culcutta university press, culcatta.

२) Ghoshal S.N. (1972), Agricultural Finaneing in changing prespective an oberview, Agricultural Banker(New Delhi), Vol.10 No.4

३) Mukhopadhya K.L. and Poll B.K. (1973), Agricultural finance in west Bengal, colcutta University press, Calcutta.

४) Sharma B.P. (1974), Role of Commercial Bank in Indias Developing Econmoy Chand & company, New Delhi.

५) Surywanshi S.D., Patil R.G., Kapse P.M. (1978), Credit Requirement Availabillty and its gap on the farms in the grina of Maharashtra. Ind. J. Agric. Eco. P. 219

६) Cuobey B.U. (1983), Agricaltural Bankng in India, Asational publicshing house, New Delhi.

७) Nabard (1986), A Study on RRBS Viability, cundected By Agricultre Finace corporation in 1986 on behalf of Nabard.

८) Jodha N.S.(1986), Common property Resources and Rural poor in dry regions of india economic and political weekly, 31:27 pp.69-81

९) Deshpande and Redid R.(1990), Social Dynamics and fermers society, acose study pani panchyats, Indian journal of Agrculteral economies. Pp.356-61

१०) Agrwal B. (1997), Envirnmental Action, Gender Equilty and Womens participation, Devlopment and change, pp. 1-44

११) Jayram B. and Mour Randipsiha (1995), Funds Flow between Rural and urban Areas- A case Study of kolhapor and parbhabni District in Maharashtra. Viewed, 22 feb 2012

१२) Sawant S.D. and other (1999), Agricultural Development in Maharashtra, problem and prospects, Dept of Eco Anlisis and research of Nabard.

१३) Shirsath B.R., Parsad B.V. and Mahesh K.S. (2001), Post harvest centers for export of graps. www. Nabrad.org.

१४) Gulathi Ashok and Bandhiya sim (2002), Capital Formation in Indian Agriculture. Defalts and policy options, Viewed, 22 feb 2012

१५) प्रा. घारोळे रा. ना. (१९९२), समाजशास्त्रीय संशोधन तत्वे आणि पध्दती, मंगेश प्रकाशन, नागपुर

१६) डॉ. नाडगोंडे गुरूनाथ, (१९९९), सामाजिक संशोधन पध्दती, फडके प्रकाशन, कोल्हापुर

१७) मुखर्जी रविंद्रनाथ, (१९९८), सामाजिक शोध व सांख्यिकी, विवेक प्रकाशन, दिल्ली.

१८) डॉ. काचोळे दा.धो. (१९९३), सामाजिक संशोधन पध्दती, कैलास पब्लिकेशन, औंरगाबाद.

संशोधक

सुभाष मापारी

मार्गदर्शक

डॉ. प्रदिप एस. जाधव

सहा. प्राध्यापक, (वाणिज्य विभाग)
बहिर्जी स्मारक महाविद्यालय, वसमत